**BEFORE THE NATIONAL GREEN TRIBUNAL,**
**WESTERN ZONE BENCH, PUNE**
**ORIGINAL APPLICATION NO. 93/2024(WZ)**
**[EARLIER LETTER PETITION NO.41/2024(WZ)]**

Sanjay Gade ........Applicant

Versus

Shree Ganesh Construction
& Ors. ......Respondents

**AFFIDAVIT IN REPLY ON BEHALF OF RESPONDENT NO.5 WATER RESOURCE DEPARTMENT, SATARA IRRIGATION DIVISION SATARA.**

I,_Shri.Yogesh Sitaram Shinde, Age - 53 years , Occupation - Service of the Respondent No.5, Satara Irrigation Division, Krishnanagar, Satara having my office at Sinchan Bhavan, Krishnanagar, Satara do hereby state on solemn affirmation as under:

I am working in the capacity of the Executive Engineer in the Satara Irrigation Division, Krishnanagar, Satara . I am filing this Affidavit-in-Reply to oppose the contents of the Application preferred and reliefs sought by the Applicant in the above captioned matter.

NOTARY ADV. MAHESH V.TAWARE SATARA DIST. MAHARASHTRA Reg.No.15612 Ex.24/11/2029 GOVT. OF INDIA

(1) I say and submit this application is filed by Shri Sanjay Gade, Tal: Jaoli, Dist: Satara by letter petition dated 20/03/2024 against M/s Shree Ganesh Construction alleging that Respondent No.2- Koregaon Nagar Panchayat has permitted construction on the riverbed of Tilaganga illegally which is being carried out by Respondent No.1-M/s Shree Ganesh Construction.

(2) I am authorized by the Respondents to file this present Affidavit-in-Reply in my official capacity I have perused the documents brought on record by the Applicant and have understood the contents of the Application and on the basis of the documents and information available in relation to the said issue, I am filing this present Affidavit-in-Reply. I crave leave to file a further Additional Affidavit in Reply as and when sought necessary.

(3) I say and submit that the Satara Irrigation Division Satara is local authority under water resources department. The subject matter in the present application is about work of Beautification / Construction of banks of River Tilganga.

NOTARY
MAHESH V. TAWARE
SATARA DIST.
MAHARASHTRA
15612
1/2029
OF INDIA

(4) I say and submit that in compliance of order dated 24/04/2025 the Sub Divisional Engineer of Satara Irrigation Division, Satara alongwith the Chief Executive Officer, Koregaon Nagar Panchyat has visited the site Tilganga River on dt.24/04/2025.

(5) I say and submit that on dt.29/04/2025 drone survey was carried out under supervision of authorized sectional engineer Sub Divisional Engineer of Dhom Irrigation Sub division, Koregaon alongwith the Junior Engineer of Koregaon Nagar Panchayat. It was observed as below :-

| Sr. No. | Name of the component | Information of work | Component situated with Level in Mtrs | Remarks |
|---|---|---|---|---|
| | Connecting the sewage from both banks of the river into a single channel | RCC pipe – 900 Millimeter Length 350 mtr. | Highest level is at 662.36 m | The Underground Sewage lines are Constructed along side the river on both banks in restrictive zone i.e. within blue line on both sides of river. This activity is mentioned vide Water Resources Department Circular No.~- 2018/(182/2018) सिं, व्य. महसूल dtd. 03/05/2018 Para 8(i)(iii) |

NOTARY ADV. MAHESH V.TAWARE GOVT. OF INDIA

| Sr. No. | Name of the component | Information of work | Component situated with Level in Mtrs | Remarks |
|---|---|---|---|---|
| 2 | Construction of retaining walls on both banks of the river | RCC on both banks, total length 650 m. | Highest level is at 662.36 m | The Retaining walls are also constructed alongside the river on both banks in restrictive zone However these walls act as protection wall to the bank and as a support wall to the sewage line which is mentioned vide above circular. |
| 3 | Parapet Wall | 0.9 m.tall | Highest level is at 663.80 m | The Parapet wall which is under Construction is constructed above retaining wall. |
| 4 | Foot path both side | Width 2.8 m. X 650 m. | Highest level is at 662.19 m | Foot path are constructed in restrictive zone. However, this footpath is constructed to cover the sewage line which is mentioned vide above circular. |
| 5 | RCC Pedestrian Bridge | Width 3 m. X length 22 m. | Above the Red Line Highest level is at 663.35m | Top level of the pedestrian bridge is constructed above the Red Line. |
| 6 | Open Meeting House | RCC 4 m. X 11.2 m. | Above the Red Line Highest level is at 664.048 m | Construction of Open meeting house is above Red Line |
| 7 | Fence wall to the proposed park | RCC 2.5 m. Height X length 45 m. | Above the Red Line Highest level is at 665.24 m | Fence wall to the proposed park is also above Red Line. |

NOTARY GOVT. OF INDIA

(6) I say and submit that red line and blue line levels are marked in the year 2021-22 at the location of ongoing beautification work on Tilganga river .These levels are as follows

Blue line level-662.58m

Red line level-663.29m

(7) I say and submit that Water Resource No. पुरनि-2018(182/2018)सिं.व्य.महसूल dated 03/05/2018. Wherein it is mentioned that-

i. In Restrictive Zone public works such as sewage / drainage line, sewage treatment plant etc. are permitted activity.

ii. In Prohibitive Zone gardens / play grounds etc. are permitted activity.

Hereto marked and annexed as **"Annexure R5-I"** copy of Water Resource Department, Maharashtra Circular.

(8) Hence this affidavit.

Respondents No. 5
(Yogesh Sitaram Shinde)
Executive engineer
Satara Irrigation Division
Satara

Pune
Date: 16/ 06 /2025

NOTARY
GOVT. OF INDIA

EX. ENGR. SATARA IRRIGATION DIVISION
SATARA

VERIFICATION

I,_ Shri.Yogesh Sitaram Shinde Age: 53 Adult, Satara Irrigation Division, Krishnanagar, Satara of the Respondent No. 5 authorized signatory for Irrigation Division do hereby state on solemn affirmation that what is stated forgoing Para's is true and correct to my own knowledge and belief.

Solemnly affirmed at

This 16th day of June, 2025

Respondents No. 5
(Yogesh Sitaram Shinde)
Executive engineer
Satara Irrigation Division
Satara

Adv. for Respondents No. 5

EX. ENGR. SATARA IRRIGATION DIVISION SATARA

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL

CANCELLED

NOTARY GOVT. OF INDIA

BEFORE ME
ADV. MAHESH V. TAWARE
NOTARY GOVT. OF INDIA
REG.NO. 15812 AREA SATARA DIST
Mob.No.9766024730

NOTED & REGISTERED
at Serial No. 81/2025
Date 16/06/2025

**पुराचा संभाव्य धोका टाळण्यासाठी पूररेषेच्या आत कोणतेही बांधकाम न होण्याच्या दृष्टिने पूररेषेची आखणी करणे व निषिद्ध व नियंत्रित क्षेत्राचा उपयोग करण्याबाबत मार्गदर्शक सूचना**

**महाराष्ट्र शासन**

**जलसंपदा विभाग,**

**शासन परिपत्रक क्र पूरनि-२०१८/(१८२/२०१८) सिं.व्य.(महसूल)**

मंत्रालय, मुंबई ४०००३२,

दिनांक:-३ मे, २०१८

<u>वाचावे</u> :- शासन परिपत्रक क्र.एफडीडब्लू -१०८९/२४३/८९/ सिं.व्य.(कामे), दि. २.०९.१९८९, दि.२१.९.१९८९

**<u>प्रस्तावना :-</u>**

पाटबंधारे विभाग शासन परिपत्रक क्र एफडीडब्लु १०८९/२४३/८९/ सिंव्य (कामे) दि.२.९.१९८९ व दि.२१.९.१९८९ अन्वये पुराचा संभाव्य धोका टाळण्यासाठी पूररेषेच्या आत कोणतेही बांधकाम न होण्याच्या दृष्टीने पूररेषेची आखणी करण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

नदीच्या निळया पूररेषेच्या आत निषिध्द क्षेत्रात व लाल पूररेषा व निळी पूर रेषा यांच्यामधील नियंत्रित क्षेत्रात शहरांच्या ,गावांच्या, तिर्थक्षेत्र विकासाच्या दृष्टीने नदीवर पूल बांधणे,पूलाचे दोन्ही बाजूने पोहोच रस्ते तयार करणे, शहराच्या विकास आराखडयानुसार नदीच्या बाजूने जाणारे रस्ते, उद्याने व जॉगींग ट्रॅक तयार करणे तसेच पूरसंरक्षक कामांतर्गत नदीच्या तीरालगत पूर संरक्षक भिंत बांधणे,घाट बांधणे या शिवाय गॅस पाईपलाईन क्रॉसिंग करणे ,विद्युत वाहिनी क्रॉसिंग करणे, नदीच्या कडेने ड्रेनेज पाईप लाईन टाकणे,मल:निसारण प्रकल्पाचे काम करणे, इ. प्रकारच्या सार्वजनिक स्वरुपाच्या अपरिहार्य कामांसाठी संबंधित शासकीय / निमशासकीय संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था कडून ना-हरकत प्रमाणपत्रांची वाढती मागणी, जलसंपदा विभागामार्फत राज्यातील विविध नदीनाल्यांवर पूर्ण झालेल्या प्रकल्पांची संख्या व बांधकामाधीन प्रकल्पांची संख्या ,काळानुरुप बदलेले पर्जन्यमानाचे स्वरुप, पूरनियंत्रण व पुराचे अंदाज वर्तवण्याबाबत उपलब्ध अत्याधुनिक यंत्रणा इत्यादी गोष्टींचा एकत्रित पणे विचार करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

शासन परिपत्रक क्र न्यायप्र -२०१४ प्र.क्र.४२४/२०१४ सिंव्य (म), दि.२.३.२०१५ , अन्वये जलसंपदा विभागामार्फत पूरक्षेत्र व पूररेषा नकाशे व आराखडयांना मान्यता देण्यात येते. तथापि पाटबंधारे विभाग शासन परिपत्रक क्र एफडीडब्लु १०८९/२४३/८९/ सिंव्य (कामे), दि.२.९.१९८९ व दि.२१.९.१९८९ अन्वये नदीच्या निळया पूररेषेच्या (Blue Line) आत निषिध्द क्षेत्रात (Prohibitive Zone) आणि लाल पूररेषा(Red Line) व निळी पूर रेषा(Blue Line) यांच्यामधील नियंत्रित क्षेत्रात(Restrictive Zone) सार्वजनिक सुविधांच्या दृष्टीने आवश्यक नेमकी कोणती अपरिहार्य कामे घ्यावीत याबाबत अधिक स्पष्टता आणण्याच्या दृष्टीने सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. यादृष्टीने एकत्रित सुधारित / अद्ययावत सूचनांचा समावेश करुन आता खालील प्रमाणे परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

**परिपत्रक -**

१. पाटबंधारे विभाग शासन परिपत्रक क्र एफडीडब्लु १०८९/२४३/८९/ सिंव्य (कामे) दि.२.९.१९८९ व दि.२१.९.१९८९ अद्ययावत करण्यात येत आहे.

२. पूरक्षेत्रातील जमिनीच्या वापराबाबत धरण सुरक्षितता संहिता ( Dam safety Manual) प्रकरण ८/ १९८४ मध्ये दिलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या आधारे महत्वाच्या पूररेषा हया मुख्यत्वेकरुन दोन प्रकाराच्या आहेत. निषेधक पूररेषा ( Blue Line) व नियंत्रक पूररेषा ( Red Line) .

३. निळी पूररेषा (Blue Line) :-

निळी पूररेषा (Blue Line) ही खालीलपैकी येणाऱ्या जास्तीत जास्त विसर्गाच्या पाणी पातळीला आखलेल्या रेषेला संबोधण्यात यावी.

अ) सरासरीने २५ वर्षातून एकदा (१ in २५ year) या वारंवारीतेने (Frequency) येणारा पूर विसर्ग

किंवा

ब) प्रस्थापित नदीपात्राच्या विसर्गक्षमतेच्या दिडपट विसर्ग.

४. लाल पूररेषा (Red Line) :-

लाल पूररेषा (Red Line) ही खालीलपैकी येणाऱ्या विसर्गाच्या पाणी पातळीला आखलेल्या रेषेला संबोधण्यात यावी.

अ) ज्या भागात धरण नसेल तेथे :- सरासरीने १०० वर्षातून एकदा (१ in १०० year) या वारंवारीतेने (Frequency) येणारा पूर विसर्ग.

ब) ज्या भागात धरण असेल तेथे :- प्रकल्पाच्या संकल्पनातील सांडव्यावरून वाहणारा संकल्पित महत्तम पूर विसर्ग अधिक धरणाखालील पाणलोट क्षेत्रातून येणारा अपेक्षित १०० वर्षातून येणारा (१ in १०० year) या वारंवारीतेने (Frequency) येणारा पूर विसर्ग.

५. निषिध्द क्षेत्र (Prohibitive Zone) :-

नदीच्या उजव्या तीरावरील निळी पूर रेषा (Blue Line) ते नदीपात्र ते डाव्या तीरावरील निळी रेषा (Blue Line) या मधील क्षेत्राला निषिध्द क्षेत्र (Prohibitive Zone) म्हणून संबोधण्यात यावे.

६. नियंत्रित क्षेत्र (Restrictive Zone) :-

नदीची निळी पूररेषा (Blue Line) ते त्याच तीरावरील लाल पूररेषा (Red Line) यामधील क्षेत्राला नियंत्रित क्षेत्र (Restrictive Zone) संबोधण्यात यावे.

७. निषिध्द क्षेत्राचा (Prohibitive Zone) उपयोग फक्त मोकळया जमिनीच्या स्वरुपात उदा. उदयाने, खेळाची मैदाने किंवा हलकी पिके घेणे , ज्याठिकाणी पिके घेण्याचा हक्क पारंपारिक वापरामुळे प्रस्थापित झाला आहे अशा ठिकाणी (उदा. नदीपात्राजवळ करण्यात येणारी कलींगड / टरबूज / खरबूज इ.ची लागवड सार्वजनिक शौचकूप व मल:निस्सारण सुविधा ) अशा सारख्या कारणांसाठीच केला जावा की जेणे करुन नदी प्रवाहात कोणताही अडथळा येणार नाही , नदीची वहनक्षमता कमी होणार नाही व नदीच्या काटछेदात कोणताही बदल होणार नाही .

८. नियंत्रक क्षेत्राचा (Restrictive Zone) उपयोग खालील कारणांसाठीच केला जावा .

i) सार्वजनिक हिताच्या दृष्टीने आवश्यक व अपरिहार्य मल:स्सारण योजना .

ii)सार्वजनिक हिताच्या दृष्टीने आवश्यक व अपरिहार्य सार्वजनिक रस्ते की जेणेकरुन सदर रस्त्याची माथा पातळी निळया पूररेषा पातळीच्या वर असेल. सदर पातळी किती वर असावी याची निश्चिती संबंधित Indian Road Congress Code मधील तरतुदींनुसार करावी.

iii) सार्वजनिक हिताच्या दृष्टीने आवश्यक व अपरिहार्य पाणीपुरवठा पाईपलाईन,गॅस पाईप लाईन , ड्रेनेज पाईपलाईन की जेणेकरुन सदर पाईप लाईन भूमिगत असावी व त्यामुळे नियंत्रित क्षेत्रातील नदीच्या काटछेदात कोणताही अडथळा येऊन त्यात बदल होणार नाही.

iv) नियंत्रित क्षेत्रातील बांधकामांच्या तळमजल्याच्या जोत्याची पातळी लाल पूररेषा पातळीच्या वर सुरक्षित उंचीपर्यंत असावी की ज्यामुळे पूरपातळी नियंत्रक क्षेत्रात जास्त वाढण्यापूर्वी तेथील नागरिकांना सुरक्षितस्थळी सहजपणे जाता येईल. तसेच या क्षेत्रामध्ये येणारा संभाव्य पूर व तसेच पुरामुळे होणारी जिवित हानी व मालमत्तेचे नुकसान टाळण्यासाठी हया क्षेत्रातील लोकांना, जनावरांना व वस्तुंना अल्पावधीची पूरसूचना मिळताच हे क्षेत्र तातडीने सोडून सुरक्षित स्थळी जाणे शक्य होईल.

९. उपरोक्त मुद्दा क्र. ८ मध्ये नमूद उपयोगांमुळे नदी प्रवाहात कोणताही अडथळा येणार नाही , नदीची वहनक्षमता कमी होणार नाही व नदीच्या काटछेद क्षेत्रात कोणताही बदल होणार नाही , याची दक्षता घेण्यात यावी . प्रवाहाला अडथळा आणणारे बांधकामाविरुध्द मुख्य अभियंता कारवाई करण्यास सक्षम असतील. निषिध्द (Prohibitive Zone) व नियंत्रित क्षेत्रात (Restrictive Zone) करावयाच्या सदर सार्वजनिक कामांच्या सुरक्षिततेची संपूर्ण जबाबदारी संबधित विभागाची / स्थानिक स्वराज्य संस्थेची असेल व संभाव्य पुरामुळे होणाऱ्या जिवीत व वित्त हानीस संबधित विभाग/ स्थानिक स्वराज्य संस्था जबाबदार राहील व त्याअनुषंगाने उद्धभवणाऱ्या न्यायालयीन प्रकरणास संबधित विभाग / स्थानिक स्वराज्य संस्था जबाबदार असेल.

१०. वरील बाबींचा विचार करुन पुराचा संभाव्य धोका टाळण्यासाठी व निषिध्द व नियंत्रित क्षेत्राची निश्चिती करण्याच्या दृष्टीने आवश्यक पूररेषा आखून देण्याबाबत जलसंपदा विभागाकडे जिल्हाधिकारी , स्थानिक स्वराज्य संस्था अथवा अन्य विभागाकडून मागणी प्राप्त झाल्यास जलसंपदा विभागाच्या संबधित क्षेत्रिय मुख्य अभियंता यांनी शासन परिपत्रक क्र न्यायप्र -२०१४ प्र.क्र.४२४/२०१४ सिंव्य (म), दि.२.३.२०१५ अन्वये कार्यवाही करावी.

११. जलसंपदा विभागाचे कार्यक्षेत्र नदी किनारी पूररेषेची आखणी करण्याइतपतच मर्यादित असल्याने निषिध्द क्षेत्रातील व नियंत्रित क्षेत्रातील उपरोक्त परिच्छेदात नमूद केलेली सार्वजनिक हिताच्या दृष्टीने अपरिहार्य व आवश्यक कामांना जलसंपदा विभागाच्या ना-हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता राहणार नाही .

तथापि, पर्यावरण विभाग/ इतर विभाग/ स्थानिक संस्था/ इतर शासकीय विभाग यांची वैधानिक मान्यता आवश्यक असेल तर ती स्वतंत्रपणे घेण्यात यावी.

१२. सदर शासन परिपत्रक विधी व न्याय विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. ३८८-२०१८/E दि.१३.४.२०१८ व नगरविकास विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. टिपीएस -१०१८/अनौस.५/२०१८/ नवि -९ दि.१९.४.२०१८ नुसार निर्गमित करण्यात येत आहे .

१३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५०३१८०१५९५७२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**( च.आ.बिराजदार )**
सचिव (लाक्षेवि)

**प्रत :-** मा. राज्यपाल यांचे सचिव,

१. मा.मुख्यमंत्री यांचे कार्यालय,
२. मा.अध्यक्ष / उपाध्यक्ष, विधानसभा, विधानभवन, मुंबई,
३. मा.सभापती / उपसभापती, विधानपरिषद, विधानभवन, मंबई,
४. मा.विरोधी पक्षनेते, विधानसभा, मुंबई, यांचे कार्यालय, विधानभवन, मुंबई,
५. मा.विरोधी पक्षनेते, विधानपरिषद, मुंबई, यांचे कार्यालय, विधानभवन, मुंबई,
६. मा. मंत्री, जलसंपदा यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. मा. राज्यमंत्री (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
८. महालेखापाल १ / २ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
९. महालेखापाल १ / २ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर,
१०. अ.मु.स (गृह) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
११. अ.मु.स (महसूल) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. अ.मु.स. (पर्यावरण) यांचे स्वीय सहायक, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३. प्रधान सचिव (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१४. प्रधान सचिव (नगरविकास) यांचे स्वीय सहायक, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
१५. सचिव (जसंव्य व लाक्षेवि) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१६. सचिव (प्रकल्प समन्वय) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१७. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१८. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
१९. सर्व महासंचालक, जलसंपदा विभाग,

२०. सर्व विभागीय आयुक्त, महसूल विभाग, महाराष्ट्र राज्य,
२१. सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य,
२२. सर्व कार्यकारी संचालक, जलसंपदा विभाग,
२३. संचालक, नगररचनाकार, पुणे,
२४. सर्व मुख्य अभियंता/मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, जलसंपदा विभाग,
२५. जलसंपदा विभागातील सर्व सहसचिव व उपसचिव, मंत्रालय, मुंबई,
२६. सर्व अधीक्षक अभियंता/अधीक्षक अभियंता व प्रशासक, जलसंपदा विभाग,
२७. ग्रंथालय, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई,
२८. सिं.व्य. (महसूल) कार्यासन, संग्रहार्थ,